**<u>नियमित दिवाणी मुकादमा क्र. १५/२०२२ मधील निशाणी क्र. १४३ वरील आदेश</u>**

( पुंजाराम काळे व इतर वि. अंबादास काळे व इतर)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज वादी क्रमांक २३ यांचे कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर सामील करणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** वादी क्रमांक २३ कल्पना रघुनाथ भागवत हिचा मुत्यु दिनांक ११.०४.२०२५ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर वादीचे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक ११.०७.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे वादीचा दावा अवसायन पावला आहे. नि.१४१ वरील आदेशाप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे व दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करण्यात आला आहे. प्रस्तुत दावा वादीने वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादी क्रमांक २३ हिच्या पश्चात तिच्या कायदेशिर प्रतिनिधींना प्रस्तुत दावा चालविण्याचे अधिकार प्राप्त होतात. अर्जामधील नमूद इसम वादी क्रमांक २३ हिचे कायदेशिर प्रतिनिधी नाही अशी कोणतीही हरकत प्रतिवादींनी नोंदविलेली नाही. त्यामूळे अर्जात नमूद कायदेशिर प्रतिनिधींना वादी क्रमांक २३ चे कायदेशिर प्रतिनिधी म्हणुन दाव्यात सामील करणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टिने आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्रमांक २३ यांचे कायदेशिर प्रतिनिधींना अभिलेखावर सामील करण्यात यावे. अर्जदाराने तशी दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत दाखल करावी.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.05.07 15:09:13 +0530

स्थळः— इगतपुरी
दिनांकः— ०७/०५/२०२६

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
इगतपुरी.